**परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय क्र. 5 - मुंबई**
**द्वितीय सत्रांत परीक्षा २०२३-२४**

**इयत्ता १० वी** **विषय- मराठी (द्वितीय भाषा)**
**वेळ : ११/२ तास** **एकूण गुण - ४०**

---

## विभाग - "अ" - वाचन व आकलन

**प्रश्न १ खालील उतारा वाचून त्यावर आधारीत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

"आजच्या जगात संगणकाने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रवेश केला आहे. बहुतेक सर्व मोठया कारखान्यात उत्पादनाची योग्य आखणी करण्यासाठी कच्च्या मालाचा पुरवठा योग्य रितीने होत आहे की नाही हे ठरविण्यासाठी संगणक वापरला जातो. बँकांमध्ये, उद्योगक्षेत्रात, शेअरबाजारात संगणकाशिवाय पान हालत नाही. अंतराळाचा मार्ग संगणक निश्चित करतो. कोणत्या हवाई उड्डाणात किती जागा शिल्लक आहेत हे जगभर एकाच वेळी समजावे म्हणून विमानाच्या आरक्षणासाठी संगणकाला कामाला लावण्यात येते. कुणी सांगावे, आणखी काही वर्षांनी तुमचा डॉक्टर किंवा तुमच्या मुलाचा शिक्षक संगणकच असेल. दहा जणांचे काम एकट्याने करुन देणारा तो महत्वाचा घटक ठरेल. संगणकास लागणारी माहिती (प्रोग्रॅम्स) तयार करण्यासाठी खास शिक्षण घेतलेली माणसे लागतात. या कामाला सॉफ्टवेअर तयार करणे म्हणतात. असे सॉफ्टवेअर बनवून परदेशी पाठवल्यामुळे देशास भरपूर परकीय चलन मिळू शकेल. या दृष्टीने संगणक भारतास वरदान ठरु शकेल."

**प्रश्न.१ अ) उतारा वाचून त्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायांमधून निवडा. (३ x १ = ३)**

१. 'अंतराळ' या शब्दाचा अर्थ लिहा.
१) धरती २) आकाश ३) वायू ४) सूर्य

२. 'वरदान' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द लिहा.
१) शाप २) आर्शिवाद ३) वरदहस्त ४) दान

३. संगणक .............. जणांचे काम एकट्याने करतो.
१) पाच २) दोन ३) दहा ४) वीस

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा. (३ x १ = ३)**

१. अंतराळाचा मार्ग कोण निश्चित करतो?

२. सॉफ्टवेअर तयार करणे म्हणजे काय?

३. सॉफ्टवेअर बनवून परदेशी पाठवल्यामुळे देशास काय मिळू शकते?

**क) थोडक्यात उत्तर लिहा. (कोणतेही एक) (२ x १ = २)**

१. कारखान्यात संगणक कशासाठी वापरला जातो?

२. संगणकाला कोणत्या कामाला लावण्यात येते?

## विभाग - "ब" - व्याकरण

प्रश्न.२ **अ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही ४) (४ x १ = ४)**

१. सर्वांनी नेहमी कष्ट करावे. (सर्वनाम ओळखा)

१) नेहमी २) सर्वांनी ३) कष्ट ४) करावे

२. खालीलपैकी भाववाचक नामाचा योग्य पर्याय कोणता?

१) वर्ग २) शांतता ३) पुस्तक ४) झाड

३. खालीलपैकी योग्य विधान कोणते?

१) उभयान्वयी अव्यय दोन शब्द किंवा दोन वाक्य जोडते.

२) उभयान्वयी अव्यय फक्त दोन वाक्य जोडते.

३) उभयान्वयी अव्यय फक्त दोन शब्द जोडते.

४) उभयान्वयी अव्यय वरीलपैकी काही जोडत नाही.

४. आमचे गाव डोंगराच्या कुशीत होते. (क्रियापद ओळखा)

१) गाव २) आमचे ३) डोंगराच्या ४) होते

५. झाडावर पक्षी बसले आहेत. (शब्दयोगी अव्यय ओळखा)

१) झाड २) वर ३) पक्षी ४) खूप

**ब) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. सूर्य पूर्वेस उगवतो. (काळ ओळखा)

१) भूतकाळ २) भविष्यकाळ ३) वर्तमानकाळ ४) पूर्ण भूतकाळ

२. खालीलपैकी कोणते वाक्य वर्तमानकाळातील आहे.

१) हिरवे डोंगर खूप सुंदर होते. २) हिरवे डोंगर खूप सुंदर आहेत.

३) हिरवे डोंगर खूप सुंदर असणार ४) हिरवे डोंगर खूप सुंदर असतील.

३. समीर पुस्तक वाचत आहे. (भूतकाळातील वाक्य बनवा)

**क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. अहाहा! किती सुंदर देखावा आहे हा ! (या वाक्याचे विधानार्थी वाक्य बनवा)

२. समीर हुशार मुलगा आहे. (विधानार्थी नकारात्मक वाक्य बनवा)

३. तुम्ही सर्वांनी अभ्यास करा. (वाक्याचा प्रकार ओळखा)

**ड) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. गटात न बसणारा शब्द कोणता?

१) सप्तसिंधू २) नवरात्र ३) चौकोन ४) सत्यासत्य

२. सासूसासरे (समास ओळखा.)

१) वैकल्पिक द्वंद्व  २) समाहार द्वंद्व  ३) इतरेतर द्वंद्व  ४) अव्ययीभाव

३. या समासाचे पहिले पद बहुदा अव्यय असते.
१) वैकल्पिक द्वंद्व  २) अव्ययीभाव  ३) इतरेतर द्वंद्व  ४) द्विगू

**प्रश्न.३ अ) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. समानार्थी शब्दांची योग्य जोडी कोणती?
१) वायू - वारा  २) दिवस - रात्र  ३) गोड - कडू  ४) चांगले - खरे

२. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता?
१) फूल  २) कवी  ३) सुमन  ४) पुष्प

३. खालीलपैकी गटात न बसणारा शब्द कोणता?
१) पक्षी  २) खग  ३) विहंग  ४) प्राणी

**ब) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. विरुध्दार्थी शब्दाची योग्य जोडी कोणती?
१) स्मरण x आठवण  २) बिकट x कठीण ३) खरेदी x विक्री  ४) दास x नोकर

२. 'कनवाळू' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द निवडा.
१) दयाळू  २) मायाळू  ३) प्रेमळ  ४) कठोर

३. 'विश्वास' या शब्दाचा विरुध्दार्थी शब्द लिहा.
१) खात्री  २) अविश्वास  ३) भरवसा ४) भेद

**क) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. एकवचनी शब्द ओळखा.
१) शाल  २) लाडू  ३) गोष्ट  ४) नदी

२. दोरी या शब्दाचा अनेकवचनी शब्द लिहा.

३. आईने <u>भाजी</u> आणली. (अधोरेखित शब्दाच्या वचनामध्ये बदल करुन वाक्य पुन्हा लिहा.)

**ड) सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. पुढीलपैकी स्त्रीलिंगी शब्द कोणता?
१) कुमार  २) लोहार  ३) कुमारी  ४) मालक

२. लिंग विचारानुसार गटात न बसणारा शब्द ओळखा.
१) गाडी  २) विजेती  ३) नायक  ४) वही

३. पुढीलपैकी पुल्लिंगी शब्द कोणता?
१) दासी  २) वानरी  ३) तरुणी  ४) कुंभार

## विभाग - "क" - पाठ्यपुस्तकावर आधारित

**प्रश्न.४ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून लेखक कोठे गेले होते?

२. २००४ च्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते?

३. लेखकाच्या उपोषणाची हकिकत कोठे जाहीर झाली?

**ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा. (कोणतेही तीन) (३ x १ = ३)**

१. लेखक ................ भीक घालणार नव्हते.
१) भिक्षेकऱ्याला २) लोकांना ३) टीकेला ४) म्हातारीला

२. ........... कमी झाली तर वजन उतरते.
१) साखर २) तहान ३) भूक ४) झोप

३. पाठात ............ या नदीचा उल्लेख आला आहे.
१) गंगा २) यमुना ३) कृष्णा ४) कोयना

४. त्या बाईचे बाळ .............. कुडकुडत होते.
१) तापाने २) थंडीने ३) पावसाने ४) उन्हाने

**क) थोडक्यात उत्तर लिहा. (कोणतेही एक) (१ x २ = २)**

१. पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दांत वर्णन करा.

२. शाल व शालीनता यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

**प्रश्न.५ अ) एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (२ x १ = २)**

१. कवीची जिंदगी कशात बरबाद झाली?

२. हरघडी कवीने काय वाळविले नाहीत?

३. मेघाला कोण विणवतो?

**ब) रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा. (कोणतेही तीन) (३ x १ = ३)**

१. अग्निमाजि पडे बाळू .............. धांवे कनवाळू ||१||

१) ताई २) माता ३) काकी ४) मामी

२. नामा म्हणे ............. जैसा |

१) पाऊस २) ढग ३) मेघा ४) वारा

३. दुनियेचा विचार ............ केला.
१) हरवेळी २) प्रत्येक वेळी ३) दरवेळी ४) हरघडी

४. ............ पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे याच शाळेत शिकलो.

१) आनंद २) दु:ख ३) हर्ष ४) खुशी

**क) संदर्भासह स्पष्टीकरण करा. (कोणतेही एक) (१ x २ = २)**

१. दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.

हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे.

२.  भुकेले वत्सरावे ।

धेनु हुंबरत धांवे ।।

* समाप्त *